# लीलावती रुग्णालयाच्या वतीने मोफत हृदयरोग तपासणी शिबिराला उत्तम प्रतिसाद

मुंबई - युज हार्ट फॉर ॲक्शन या संकल्पनेतंर्गत लीलावती हॉस्पिटलने मेनाबेन हेल्पिंग हँड्सच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या उपक्रमातंर्गत हृदयाचे आरोग्य चांगले कसे राखता येईल, तसेच हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याविषयी जनजागृती करण्यात आली. हृदयविकारांबद्दल जागरूकता वाढवून वेळीच निदानाचे महत्त्व पटवू देणे हे या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. या शिबिरातंर्गत उपस्थितांना कोलेस्ट्रॉल तपासणी, एलडीएल, इलेक्ट्रोकार्डियोग्राम (ECGs), ट्रायग्लिसरायड्स, रँडम ब्लड शुगर, रक्तदाब चाचणी आणि हृदयरोग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, यासह विविध स्क्रीनिंग चाचण्या केल्या जातील. या शिबिरात ३०० पेक्षा रुग्ण सहभागी झाले होते. लीलावती रुग्णालयातील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. विद्या सुरतकल म्हणाल्या की, हृदयविकाराचा झटका, हार्ट फेल्युअर आणि सडन कार्डियाक अरेस्ट, एनजाइना, कोरोनरी आर्टरी डिसीज (सीएडी), कार्डिओमायोपॅथी, हृदयाच्या झडपांचे आजार यासह हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. यामुळे रुग्णाचा मृत्यूही होऊ शकतो.